कृषितंत्र

# मल्चिंग पेपरच्या मदतीने करा भात लागवड



**ज्ञानेश्वर ताथोड**
(मो.नं. ९६०४८१८२२०)
विषय विशेषज्ञ
**संदीप कऱ्हाळे**
वरिष्ठ शात्रज्ञ तथा प्रमुख
कृषी विज्ञान केंद्र,
सोनापूर -गडचिरोली

**शे**तामध्ये काम करताना शेतकरी विविध प्रयोग करत असतो आणि त्याचे हे यशस्वी प्रयोगच कालांतराने आधुनिक तंत्रज्ञान म्हणून ओळखले जाते.

पारंपरिक पद्धतीने भातशेती करताना शेतकऱ्यांना बऱ्याच समस्यांचा सामना करावा लागत असतो. मल्चिंग पेपरच्या मदतीने भातशेती हा आधुनिक प्रयोग या सगळ्यावर एक उत्तम पर्याय म्हणून समोर आला आहे. या तंत्रज्ञानाच्या अवलंबाने केवळ खर्चातच कपात होत नाही तर कमी वेळात दर्जेदार उत्पादन मिळवता येते. भाताची काढणी झाल्यानंतर त्याच शेतजमिनीत वाल, मका तसेच हरभरा यांसारखी पिके यशस्वीरित्या घेतली जातात.

**मल्चिंग वापराचे फायदे :** बियाणे कमी लागते व जमिनीची धूप कमी होते.

मल्चिंगच्या वापरामुळे चिखलणी, रोपवाटिका तसेच लावणी व आंतरमशागतीचा खर्च कमी होतो.

मशागत आणि गादीवाफे तयार करण्याचा खर्च एकदाच होतो. दोन वर्षांपर्यंत मशागतीचा खर्च टाळता येतो.

पाणी मर्यादित लागते. कीटक आणि रोगांपासून पिकाचा बचाव होतो.

गादीवाफ्यांवर तण उगवत नाही व दर्जेदार आणि अतिरिक्त उत्पादन शक्य होते. उत्पादनात १.५ ते २ पट वाढ होते. एकाच गादीवाफ्यावर तीन वेळा पीक घेणे शक्य होते. जमिनीत ओलावा टिकून राहिल्याने रब्बीत हरभऱ्याचे चांगले उत्पादन येते.

**वैशिष्ट्ये :** पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत तणांची वाढ आणि तण नियंत्रणावरील खर्च कमी होतो.

आच्छादन तंत्रज्ञानामुळे भात उत्पादकता वाढविण्यास मदत.

चिखलणी आणि पऱ्हे करण्याच्या पारंपरिक पद्धतीमुळे होणारी मातीची हानी टाळता येते.

प्लॅस्टिक मल्चिंगमध्ये नुकसान टाळता येते आणि उत्पादकता २७.४० टक्क्ने वाढवता येते.

४० मायक्रॉन जाडीच्या प्लॅस्टिक आच्छादनाच्या चंदेरी रंगामुळे सूर्यप्रकाशाचे परावर्तन जास्त होते- जे विशेषतः पावसाळी आणि ढगाळ दिवसांमध्ये झाडांची वाढ होण्यास उपयुक्त ठरते.

लागवडीचा खर्च कमी झाल्याने शेतकरी रब्बी आणि उन्हाळी हंगामात पिके घेण्यास प्रवृत्त होतात.

पारंपरिक पद्धतीत चिखलणी, रोपवाटिका आणि रोवणीसाठीचा होणारा खर्च वाचतो तसेच बियाणे सुद्धा कमी लागते.

**तंत्रज्ञान :** नांगरणी आणि कुळवणी केल्यानंतर गादीवाफे तयार करावेत.

४.५ फुटांवर सरी खणून घ्याव्यात आणि गादीवाफ्यांची रुंदी ३ फुटांपर्यंत ठेवावी. दोन गादीवाफ्यांमधील अंतर १.५ फूट ठेवावे आणि गादीवाफ्यांवर मल्चिंग पेपर अंथरावा. पाऊस झाल्यानंतर मल्चिंग पेपरवर १ X १ फुटावर साधारण २ इंचाची छिद्रे पाडावीत. मातीमध्ये अपेक्षित ओलावा निर्माण झाल्यानंतर प्रत्येक छिद्रात ४ ते ५ बियाणी टाकावीत. बियाण्याची लागवड केल्यानंतर १५ दिवसांत युरियाचा हफ्ता द्यावा. दोन गादीवाफ्यांच्या मध्ये छोटी छिद्रे करून युरिया ब्रिकेट्स टाकावे

एक एकरसाठी साधारण ६५ किलो युरिया लागू शकतो.

**महत्त्वाच्या बाबी :** एकाच गादीवाफ्यावर सलग चार वेळा पीक घेणे शक्य आहे.

गादीवाफ्यांवर पसरलेला मल्चिंग पेपर तीन वर्षे वापरता येऊ शकतो.

याचाच अर्थ सलग चार वर्षे गादीवाफे तयार करणे, मल्चिंग आणि कामगारांवर होणाऱ्या खर्चात निश्चित कपात होऊ शकते.